# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

## F. Y. B. A. मराठी

## मराठी विषयाचा पुनर्रचित अभ्यासक्रम- जून २०१९ पासून

## Choice Based Credit System [CBCS]

### निवड आधारित श्रेयांक पद्धत

| सत्र | विषयाचे नाव |
|---|---|
| **नियमित अभ्यासक्रम** | |
| पहिले | मराठी साहित्य : कथा आणि भाषिक कौशल्यविकास [CC-1 A] |
| दुसरे | मराठी साहित्य : एकांकिका आणि भाषिक कौशल्यविकास [CC-1 A] |
| **पर्यायी अभ्यासक्रम** | |
| पहिले | व्यावहारिक व उपयोजित मराठी - भाग १ [CC-1 A] |
| दुसरे | व्यावहारिक व उपयोजित मराठी - भाग २ [CC-1 A] |

## F. Y. B. A. मराठी विषयाचा पुनर्रचित अभ्यासक्रम- जून २०१९ पासून

१. Title of the course: B.A. (मराठी)

२. Preamble of the syllabus:

उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक पार्श्वभूमी ही ज्ञानरचनावादाची आहे. या विद्यार्थ्यांचे पूर्वानुभव, पूर्वज्ञान हे जिज्ञासा, निरीक्षण, प्रयोग, सर्जनशीलता, उपाययोजना व समस्या निराकरण अशा अध्ययन – अध्यापन सूत्रांतून निर्माण झाले आहे.

हा अभ्यासक्रम तयार करीत असताना काही आधारभूत तत्त्वे स्वीकारली आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची उद्दिष्टे प्रत्यक्षात आणताना, विद्यार्थीकेंद्री, आंतर्विद्याशाखीय, रोजगाराभिमुख, कौशल्याधिष्ठीत असे भाषा व साहित्याचे अभ्यासक्रम अनुसरणे, निर्माण करणे आवश्यक आहे. तसेच जीवन कौशल्य विकासासाठी भाषा, साहित्य, कला ही माध्यमे अधिक परिणामकारकतेने समजावून घेणे आवश्यक झाले आहे. साहित्यिक क्षमता, भाषिक क्षमता वाढीसाठी, जीवनाच्या आकलनासाठी आणि प्रगल्भतेसाठी विद्यार्थी सिद्ध करणे; ही आजची गरज बनली आहे.

**उद्दिष्टे :**

१. मराठी भाषा, मराठी साहित्य आणि मराठी संस्कृती यांचे अध्ययन करणे.
२. साहित्यविषयक आकलन, आस्वाद आणि मूल्यमापन क्षमता विकसित करणे.
३. साहित्याभ्यासातून जीवनविषयक समज विकसित करणे.
४. मराठी भाषेची उपयोजनात्मक कौशल्ये विकसित करणे.

मराठी विषयाचा अभ्यासक्रमाची पुनर्रचना खालील क्रमाने करण्यात येणार आहे.

१. First Year B.A. 2019-20.
२. Second Year B.A. 2020-21.
३. Third Year B.A. 2021-22.

B. A. (मराठी) हा पुनर्रचित अभ्यासक्रम तीन वर्षांचा आणि सहा सत्रांत विभागलेला निवड आधारित श्रेयांक पद्धतीचा (Choice Based Credit System) [CBCS] आहे. हा अभ्यासक्रम F. Y. B. A. (सत्र १ आणि सत्र २), S. Y. B. A. (सत्र ३ आणि सत्र ४), T. Y. B. A. (सत्र ५ आणि सत्र ६) अशा १३२ श्रेयांकांचा आहे.

३. Pattern: निवड आधारित श्रेयांक पद्धत (Choice Based Credit System) [CBCS]